# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/११/२०१६

**१)मोबाईल दुकानातुन पैसे न देता निघुन गेल्याने फसवनुक केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०९/२०१६ रोजी १२.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी अनिल मदन चिंदालोरे वय ३० वर्ष रा. नेहरूवार्ड मोहाडी यांचे मोबाईल दुकानात जावुन सॅमसंग कंपनीचे ०२ मोबाईल कि. ६१५००/रू चे विकत घेवुन त्या बदल्यात कॅश न देता खात्यात पैसे नसतांना चेक दिला त्यामुळे फिर्यादीची फसवनुक होवुन आर्थीक नुकशान झाल्याने मा. न्यायदंडाधीकारी कोर्ट मोहाडी यांचे कलम १५६ (३) जा.फौ.अन्वये चे आदेशान्वये पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४२०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा गि—हेपुंजे पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२ ) हत्यार घेवुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ८/११/२०१६ रोजी १९.५० वा. दर. यातील सरतर्फे फिर्यादी पोउपनी कांरडे हे पोलीस स्टेशनला हाजर असतांना पोलीस स्टेशनच्या फोनवर माहीती मिळाली की,नेहरूवार्ड वरठी येथे १ इसम हा हातात तलवार घेवुन धामधुम करीत असल्याने तेथील इसम ही धावत धावत आले व माहीती दिली त्यावरून घटनाा स्थळीरवाना होवुन यातील आरोपी हा हातात तलवार घेवुन शिवीगाळ करीत असतांना दिसला त्याची झडती घेवुन त्याचे जवळ १ बोथड तलवार वाकलेली मिळुन आल्याने व मा.जिल्हा न्यायदंडाधीकारी यांचे कलम ३७(१),(३) मपोका आदेशाचे उल्लघन केल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४,२५ भाहका सहकलम १३५ मपोका . अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी खंडाते पो. स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे .

**३) अनोळखी इसमाचा मृत्यु. :—**

दिंनाक. ०८/११/२०१६ रोजी १४.२३ वा. दर. यातील अनोळखी इसम वय अंदाजे ३० वर्ष हा एनएच ६ रोड वर गुलमोहर हॉटेल समोर नालीत मृत अवस्थेत पडलेला असलेल्या खबरेवरून मिळुन आल्याने सरतर्फे सपोनी रायपुरे पोस्टे भंडारा यांचे फिर्याद वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मुलाचा विहीरीच्या पाण्याम बुडन मृत्यु :—**

दिंनाक. ०८/११/२०१६ रोजी १६.४२ वा. दर. यातील मृतक श्रावण विष्णु सोनवाने वय २.०५ वर्ष, रा.रमना नागपुर हा फिर्यादी महेश श्रीराम हेडावु वय ३२ वर्ष रा. प्लाट क्र.०८ विदया केयर ऑफ रामेशर चमरूजी चंदनबटवे यांच्या घरी किरायाने भंडारा यांचे घरी पाहुन म्हणुन त्याची आत्ते बहीन व मृतक आले असता मृतक हा खेळत असतांना विहीरीकडे जावुन विहीरीत पडुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोस्टे भंडरा येथे कलम १७४ जाफौ चे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी चाबुकस्वार पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) मुलगी गळफास लावुन मरण पावली:-**

दिंनाक. ०/८११/२०१६ रोजी २३.४१ वा. दर. यातील मृतक दिवानी भिमराव गायकवाड वय १९ वर्ष, रा. आमगाव आदर्श यातील फिर्यादी भिमराव श्रावण गायकवाड वय ५० वर्ष रा. आमगााव आदर्श हा पत्नी सोबत दिवाळी निमीत्त भावुबिज ओवाळनी करीता पवनी येथे आला असता मृतक मुलगी हि घरी एकटीच हजर होती भाउुबिजीचा कार्यक्रम आटोपुन फिर्यादी हा आपले पत्नीसह गावी परत आला असता घरातुन दोन्ही दरवाजे आतमधुन बंद दिसल्याने मागील दरवाजा उघडुन आत प्रवेश केला असता फिर्यादीची मृतक मुलगी ही नवीन घराचे बांधकाम होत असलेल्या स्लॉपचे लोखंडी आकोडयाला दोराने गळफाास लावुन मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोस्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ चे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी बोरखडे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-**

दिनांक ०८/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १२९ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस व ईतर वाहनांवरती १०७ केसेस आणि अवैद्य प्रवासी ०८ केस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.